# देवाच्या पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशूसाठी साक्ष देणे

मुलांना शिकवणाऱ्यांनी P5b हा अभ्यास वाचावा.


**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू, माझ्या मंडळीतील विश्वासणाऱ्यांनी तू दिलेल्या सामर्थ्याचा उपयोग करुन आपल्या मित्रांना व नातेवाईकांना साक्ष द्यावी याकरीता त्यांचे साहाय्य कर. पेत्र आणि इतर शिष्यांनीही असेच केले होते''

## 1. प्रार्थना व देवाच्या वचनाच्याद्वारे आपल्या अंतःकरणाची तयारी करा

**वाचा** प्रे.कृ. 3:1-22 यामध्ये कित्येक लोकांना तारणाची सुवार्ता समजावी यासाठी पेत्र व योहानाने अनेक गोष्टी केल्या त्या पाहा. *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिले आहे)*

- पेत्राने सोन्यापेक्षाही मौल्यवान असे त्या लंगडया माणसाला काय दिले? *(वचन 6)*
- त्या लंगडया माणसाने विश्वास ठेवला तेव्हा त्याला कोणत्या सामर्थ्याने आरोग्य दिले? *(वचने 12-13 व 16)*
- पेत्र व योहान ह्यांनी कोणत्या अत्यंत महत्वपूर्ण गोष्टींची साक्ष दिली? *(वचने 14-15)*
- आपली पातके धुतली जावीत यासाठी लोकांनी काय करणे अगत्याचे आहे? *(वचन 19)*

### सामर्थ्याने साक्ष देण्यासाठी सात उपयुक्त गोष्टी




1. **डोळे.** आम्ही काय पाहावे अशी देवाची इच्छा आहे पाहा योहान 4:35-39 मध्ये.
2. **ओठ.** आम्ही येशूविषयी काय सांगितले पाहिजे पाहा लूक 24:46-48 मध्ये
3. **हात** (पवित्र शास्त्र) आम्ही देवाच्या वचनाचे काय केले पाहिजे पाहा 2 तीमथ्य 2:2 मध्ये.
   पाहा मत्तय 28:18-20 मध्ये आम्ही शिष्यांना काय शिकवले पाहिजे.
4. **अंतःकरण.** आमचे काम कशामुळे प्रभावी होते पाहा 1 करिंथ 13:1-3 मध्ये. पाहा इब्री 11:6 मध्ये देवाने कार्य करावे यासाठी आमच्याकडे काय असले पाहिजे.
   पाहा 1 थेस्सल 5:17 मध्ये आम्ही सतत काय केले पाहिजे.
   पाहा प्रे.कृ. 1:8 मध्ये आम्ही कोणाकडून सामर्थ्य मिळवावे आणि का.
5. **हात** (किल्ल्या). पाहा मत्तय 16:13-19 मध्ये येशूने पेत्राला कोणते अभिवचन दिले.
   पाहा मत्तय 18:18 मध्ये आणखी कोणाकोणाला हे अभिवचन मिळाले. पाहा योहान 20:22-23 मध्ये देव आमच्या द्वारे काय करतो.

6. **पाय** (वहाणा). पाहा इफिस 6:15 मध्ये देव कोणत्या प्रकारच्या चप्पल पुरवतो.
   पाहा यशया 52:7 पायांना काव्यात 'मनोरम' असे का म्हटले आहे.

7. **मदतनीस.** पाहा प्रे.कृ. 11:12 मध्ये पेत्राला किती मदतनीस होते. पाहा प्रे.कृ. 13:2-5 मध्ये पोलाला किती मदतनीस होते. पाहा लूक 10:1 मध्ये कितीजणांनी एकत्रित प्रवास केला.

## उत्तरे

1. **डोळे.** पिकून कापणीस तयार झालेल्या शेतांवर म्हणजेच पश्चाताप करुन विश्वास ठेवणाया लोकांवर लक्ष केंद्रित करा.

2. **ओठ.** येशूचे मरण व जीवन देणारे पुनरुत्थान आणि पश्चाताप करणाया सर्वांना मिळणारी पापक्षमा याविषयी घोषणा करा.

3. **हात ( पवित्र शास्त्र ).** आपण जे ऐकले ते इतरांना सांगा आणि विश्वासणायांना येशूचे आज्ञापालन करण्यास शिकवा.

4. **अंत:करण.** प्रत्येक गोष्ट पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यामध्ये प्रीतीने, विश्वासाने आणि प्रार्थनापूर्वक करा.

5. **हात ( किल्ल्या ).** येशूने त्याच्या राज्याच्या किल्ल्या पेत्राला देण्याचे अभिवचन दिले. हे पातकांची क्षमा करण्याच्या सामर्थ्याचे प्रतिक आहे. हेच सामर्थ्य आपल्या इतर शिष्यांना देण्याचे अभिवचन येशूने दिले. येशूने हे पापांची क्षमा करण्याचे सामर्थ्य पवित्र आत्म्याने परिपूर्ण विश्वासणायांना देण्याचे सामर्थ्य पवित्र आत्म्याने परिपूर्ण विश्वासणायांना देण्याचे अभिवचन दिले.

चार मित्रांनी आपल्या आजारी मित्राला घराच्या छतातून येशू आरोग्य देईल अशा विश्वासाने खाली सोडले तेव्हा त्या पक्षाघाती मनुष्याच्या पातकांची क्षमा करण्यासाठी त्याने स्वत:च 'किल्ल्यां' चा उपयोग केला (मार्क 2:1-12). त्यांच्या विश्वासमुळे येशूने त्याच्या पातकांची क्षमा केली.

कोणीतरी येशू आणि त्याची पापक्षमा ह्यांचा स्वीकार करील असा आपण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने विश्वास ठेवतो तेव्हा आपल्यालाही ह्या 'किल्ल्यांचा' उपयोग करता येतो. विश्वासणारा सामर्थ्याने येशूची साक्ष देतो तेव्हाच दुसया व्यक्तीचा पालट होण्यास सुरुवात होते मग, अर्थातच त्या दुसया व्यक्तीने तिच्या स्वत:च्या विश्वासाचा उपयोग करुन त्यांचा पूर्ण पालट करावा.

6. **पाय.** आमच्या पायात 'सुवार्तेने लाभलेली सिद्धता' चढवलेली असली पाहिजे. याचा अर्थ आम्ही लोकांना शांती व आनंदाचा आनंददायी संदेश सांगितला पाहिजे.

7. **मदतनीस.**

   अ) **पेत्र** परराष्ट्रीयांना येशू विषयी सांगण्यास गेला तेव्हा त्याला सहा मदतनीस होते.

   ब) पौल व बर्णबा ह्यांना त्यांचा मदतनीस योहान (मार्क) याच्यासह अंत्युखिया वरुन इतर राष्ट्रांकडे पाठवण्यात आले.

   क) **ख्रिस्ताने** सत्तरजणांना दोन दोनच्या जोडीने पाठवले. येशू आणि त्याच्या शिष्यांनी साधारणपणे, एकेकटयाने नाही तर, एक लहान गट म्हणूनच सेवा केली.



## पवित्र आत्म्याने परिपूर्ण होणे

शास्त्रलेखांमध्ये पवित्र आत्म्याने परिपूर्ण होणे किंवा त्याचे सामर्थ्य मिळवणे असा उल्लेख आहे. त्याचा उद्देश विश्वासणाऱ्यांना देवासाठी प्रत्यक्षात खरोखर काही तरी काम करता यावे असा आहे. उदाहरणार्थ, पवित्र आत्मा शमशोनावर आला आणि त्याने सिंहाला ठार केले. येशूनेच, इस्राएल लोकांना त्यांच्या शत्रूंपासून सोडवणाऱ्या घटनांची मालिका सुरु झाली. लोकांना काही तरी असाधारण असा भावनिक अनुभव मिळावा हा पवित्र आरडा-ओरडा केला असा फक्त एकच प्रसंग शास्त्रलेखात आहे, देवाने त्यांना ठार कर असे एलियाला सांगितले (1 राजे 18:25-40)

**2. आठवडयातील कार्यक्रमांविषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन योजना आखा.**

- येशूने सांगितल्या प्रमाणे साक्ष देण्यासाठी सामर्थ्य मिळावे याकरीता प्रार्थना करा, मग येशूला अद्याप ओळखत नसलेल्या लोकांची जाऊन भेट घ्या.
- ख्रिस्ताविना हरवलेल्या लोकांसाठी प्रार्थना करा.
- विश्वासणाऱ्यांना भेटा. त्यांचे मित्र-नातेवाईक कोण आहेत ते विचार, त्यांना त्यांनी येशूविषयी सांगितले पाहिजे यासाठी त्यांना काही मदत हवी असल्यास तशी मदत करण्याची तयारी दर्शवून काम सुरु करा.

**3. आगामी उपासने विषयी तुमच्या सहकाऱ्यांबरोबर चर्चा करुन योजना आखा.**

पेत्र व योहान ह्यांनी एका माणसाला आरोग्य देऊन अनेकांना येशू विषयी सांगितले, त्याबद्दल सांगा. प्रश्न विचारा (वर दिले आहेत)

सामर्थ्याने साक्ष देण्यासाठीच्या सात उपयोगी गोष्टीचे **स्पष्टीकरण करा** (वरील प्रमाणे).

ह्या सामर्थ्याचा उद्देश्य **स्पष्ट करा.**

मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्याची संधी द्या. **प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी** योहान 21:9-14 वाचा.

आणि आता येशू त्याच्या व इतरांच्या बरोबर भोजन करण्याची आम्हांला आज्ञा करतो हे स्पष्ट करा. विश्वासणा;ांनी नुकतीच सामर्थ्याने येशूसाठी कशा प्रकारे साक्ष दिली ते सांगावे.

दोन वा तीन जणांचे गट करुन बसा. एकमेकांसाठी प्रार्थना करा, योजना आखून एकमेकांना प्रोत्साहन द्या.

**पाठ करा प्रे.कृ. 4:33**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net